दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/९७/२०१८
दि.२७/०७/२०१८.

माहितीचा अधिकार

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.केतन हादाभाई बारीया (संपादक निर्भय प्रचारक), ................अपिलार्थी
१०४, भवानी ज्योत टॉवर, चंदन पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व).

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
उप-व्यवस्थापक (परिवहन)

## -: विवेचन :-

श्री.केतन हादाभाई बारीया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांचेकडे दि.०९/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) सन २०१२ ते २०१८ या कालावधीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील परिवहन विभागात वाहनचालक व कंडक्टर पुरवण्यासाठी दिलेल्या ठेक्याबाबतच्या नस्तीची सत्यप्रत करुन द्यावी.
२) निविदा सुचना नुसार दिलेल्या अटी शर्ती, कार्यादेश तसेच एम.बी. ची सत्यप्रत करुन द्यावी.
३) ठेकेदारांनी मागणी केलेल्या बिल व त्यासोबत जोडलेल्या सर्व दस्तावेजाची सत्यप्रत करुन द्यावी.
४) दिलेल्या ठरावाची सत्यप्रत करुन द्यावी.
५) ठेकेदारांनी टेंडर फार्म सोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची सत्यप्रत करुन द्यावी.
६) शासन निर्णयाची सत्यप्रत करुन द्यावी.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती मिळाली नसल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.२३/०७/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (परिवहन) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२७/०७/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.परिवहन/३२५/२०१८ दि.२५/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- मला दि.०९/०५/२०१८ रोजीच्या पत्रान्वये माहिती मिळाली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: निर्णय :-

१) अपिलार्थी अर्जदार यांनी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी तथा उप-व्यवस्थापक (परिवहन) यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले आहे. सबब, सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.केतन हादाभाई बारीया,
१०४, भवानी ज्योत टॉवर, चंदन पार्क,
नवघर रोड, भाईंदर (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
उप-व्यवस्थापक (परिवहन)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (परिवहन) यांचे कार्यालय.